ePaper
भक्तांचा चॉईसही किती फडतूस", सुषमा अंधारेंची तुफान टोलेबाजी!



वर्ष - 6 । अंक - 347 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज TM
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान
- रावेत-निगडी पुलाला 'गती'!
- शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

www.mahaenews.com | गुरुवार दि. 6, एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अग्नीशमन विभागाचा 'गल्ला'!

## तब्बल 245 कोटी उत्पन्न : 'ना हरकत' दाखल्यासाठी शुल्क आकारणी

।पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक विभागाला (PCMC) ना-हरकत दाखला (एनओसी) आणि इतर शुल्कांद्वारे 245 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. अग्निशामक विभागाच्या वतीने शहरातील इमारती, व्यवसाय, उद्योग धंद्यांना ना हरकत दाखला दिला जातो. तसेच एखाद्या कार्यक्रम स्थळी आगीची घटना घडल्यास अग्निशामक दलाची गाडी त्वरीत उपलब्ध व्हावी, यासाठी कार्यक्रमस्थळी स्टॅन्ड बाय अग्निशामक दलाची गाडी ठेवणे बंधनकारक असते. यासाठी महापालिका 5 हजार रूपये शुल्क घेत असते.**



ना हरकत दाखला देणे, सशुल्क स्टॅन्ड बाय अग्निशामक दलाची गाडी देणे आणि एखाद्या ठिकाणी पाणी फवारणे यातून अग्निशामक विभागाला उत्पन्न मिळत असते.

याचबरोबर शहर परिसरातील चारही बाजूने झपाट्याने बांधकाम प्रकल्प होत आहेत. बांधकाम परवानगीसाठी अर्ज करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना संबंधित गृहप्रकल्पासाठी अग्निशामक विभागाची एनओसी घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी आवश्यक शुल्क अग्निशामक विभागाकडे जमा करावे लागते.

### 2022-23 या आर्थिक वर्षांत सर्वाधिक उत्पन्न

» अग्निशामक विभागाला 2018-19 मध्ये 75 कोटी, 2019-20 मध्ये 65 कोटी तर 2020-21 मध्ये 53 कोटी, 2021-22 मध्ये 205 कोटी तर 2022-23 या आर्थिक वर्षांत तब्बल 245 कोटी रूपयांचे उत्पन्न मिळाले असल्याचे अग्निशामक विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी सांगितले.



# आमदार महेश लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी!

## भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार: 30 लाख रुपयांच्या खंडणीची मागणी

।पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

भाजपचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी देऊन 30 लाख रुपये खंडणीची मागणी केल्याचा प्रकार समोर आला आहे. आमदार महेश लांडगे यांच्या परिवर्तन हेल्पलाईनवर खंडणीचा मेसेज आला आहे. मसेजमध्ये खंडणीची रक्कम न दिल्यास आमदार महेश लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी नागरिकांच्या मदतीसाठी परिवर्तन हेल्पलाईन सुरु केली आहे. या हेल्पलाईनचा व्हॉट्सअप क्रमांक आहे. या क्रमांकावर मंगळवारी (दि.4) सायंकाळी अज्ञात व्यक्तीने मेसेज केला. 30 लाख रुपयांची खंडणी द्या, अन्यथा पुढील परिणामाला तयार रहा. खंडणीचे 10 लाख रुपये बँक खात्यात जमा करा आणि उर्वरतित रक्कम एका ठिकाणी असलेल्या गाडीत ठवो, असा मेसेज पाठवला आहे. खंडणीची रक्कम दिली नाही तर महेश लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी मेसेजमधून दिली आहे. हा मेसेज हेल्पलाईनचे काम करणाऱ्या यश पवार यांनी रात्री साडेनऊच्या सुमारास पाहिला.

# सावरकर गौरव यात्रा आयोजन व पक्ष संघटनेचा आ. अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी घेतला आढावा!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नियोजनन आणि बुथ सक्षमीकरण अभियान

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी आमदार झाल्यानंतर प्रथमच मतदारसंघातील भाजपचे पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते व माजी नगरसेवकांची बुधवारी (दि. ५) बैठक घेतली. त्यांनी या बैठकीत पिंपरी-चिंचवडमध्ये काढण्यात येणारी सावरकर गौरव यात्रा, पक्षाचा वर्धापन दिन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या नियोजनाचा आणि बुथ सक्षमीकरण अभियानाचा आढावा घेतला.**



काँग्रेसकडून स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा वारंवार अपमान केला जातो. त्यामुळे भाजप-शिवसेना महायुतीने राज्यभर सावरकर गौरव यात्रा सुरू केली आहे.

### सर्व कार्यक्रम उत्साहात राबवावेत

» बैठकीला सुरूवात करण्यापूर्वी पुण्याचे दिवंगत खासदार गिरीश बापट यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड-किवळे मंडल व सांगवी-काळेवाडी मंडलाची स्वतंत्र बैठक घेतली. चिंचवड विधानसभा मतदारसंघात पक्षामार्फत राबवण्यात येणाऱ्या आगामी कार्यक्रमांची माहिती व त्यांचे नियोजन करून ते यशस्वीपणे राबवण्याबाबत त्यांनी सर्वांना सूचना केल्या. ६ एप्रिल रोजी पक्षाचा स्थापना दिवस, ९ एप्रिल रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा, १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, तसेच ३० एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लोकप्रिय 'मन की बात' चा १०० व्या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत सर्वांना माहिती दिली. हे सर्व कार्यक्रम उत्साहात राबवावेत, असे आवाहन त्यांनी सर्वांना केले.

# देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान !

## टीका करणाऱ्यांनी पात्रता ओळखून घ्यावी: आढळराव पाटील

। मंचर । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'स्वतंत्र लढ्यामध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्यावर टीका करणारे कॉंग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांना देशाबदल प्रेम नाही. सावरकरांवर टीका करणाऱ्यांनी त्यांची पात्रता ओळखून घ्यावी.' अशी टीका शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केली.**



मंचर (ता. आंबेगाव) येथे शिवसेना, भाजप, महायुती यांच्या माध्यमातून आढळराव पाटील यांचे नेतृत्वाखाली मंचर शहरातून मंगळवारी (ता. ४) सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. गौरव यात्रेच्या सांगता सभेत आढळराव पाटील बोलत होते.


यावेळी भाजपच्या महिला मोर्चा प्रदेश सचिव वर्षा डहाळे, आमदार उमा खापरे, भाजप किसान मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष संजय थोरात, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री संतोष खांबकर, जयसिंगराव एरंडे, डॉ. ताराचंद कराळे, सागर काजळे, सुनील बाणखेले, अरुण गिरे, रवींद्र करंजखेले, विजय पवार, संदीप बाणखेले, प्रमोद बाणखेले, सचिन बांगर, सुशांत थोरात उपस्थित होते. श्री राम मंदिरापासून सावरकर गौरव यात्रेचा शुभारंभ झाला.डहाळे म्हणाल्या 'स्वातंत्र्याच्या आग्नी कुंडात आयुष्याच्या समिधा वाहीलेल्या क्रांतीसुर्य विनायक दामोदर सावरकर यांची जीवनगाथा सांगण्यासाठी सावरकर गौरव यात्रा काढली आहे.

### गौरव यात्रेतून सडेतोड उत्तर

**श्री राम मंदिरापासून सावरकर गौरव यात्रेचा शुभारंभ झाला. डहाळे म्हणाल्या 'स्वातंत्र्याच्या आग्नी कुंडात आयुष्याच्या समिधा वाहीलेल्या क्रांतीसुर्य विनायक दामोदर सावरकर यांची जीवनगाथा सांगण्यासाठी सावरकर गौरव यात्रा काढली आहे. स्वातंत्र्यवीरांच्या कार्य आणि निष्ठा यावर प्रश्नचिन्ह घेणाऱ्यांना या गौरव यात्रेतून सडेतोड उत्तर मिळत आहे.'**

# ग्रामपंचायत विभागाला ३५० कोटी रुपयांची घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्यात यश

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाला सरत्या आर्थिक वर्षअखेरपर्यंत (२०२२-२३) सुमारे ३५० कोटी रुपयांची घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्यात यश आले आहे. यासाठी गेल्या आर्थिक वर्षात आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतींचा चांगला फायदा झाला आहे. मात्र वसुलीच्या अखेरच्या महिन्यात सरकारी कर्मचाऱ्यांनी सुरु केलेल्या बेमुदत संपामुळे या कराच्या वसुलीचे उद्दिष्ट गाठण्यात अपयश आले आहे.

गेल्या आर्थिक वर्षातील ग्रामपंचायत कराची ४२४ कोटी रुपयांची वसुली करण्याचे उद्दिष्ट जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्यावतीने ठेवण्यात आले होते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वर्षभरात तीन ते चार लोकअदालतींचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतींचा फायदा हा ग्रामपंचायत कराची थकबाकी वसूल करण्यासाठी झाल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमार्फत गावपातळीवर आपापल्या कार्यक्षेत्रातील कुटुंबांकडून घरपट्टी, पाणीपट्टी व दिवाबत्ती कराची वसुली करण्यात येते. यानुसार दरवर्षी मार्चअखेर पर्यंत जास्तीत जास्त कर वसूल करण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात म्हणजेच मार्च महिन्यात अधिकाधिक वसुली करण्यावर भर दिला जातो. यंदा मात्र याच महिन्याच्या १४ तारखेपासून सर्वच सरकारी कर्मचारी हे बेमुदत संपावर गेले होते. हा संप आठवडाभर चालला आणि त्यानंतर आलेल्या काही सरकारी सुट्ट्यांमुळे यंदाच्या मार्च महिन्यातील केवळ दहा ते बाराच दिवस हे कर वसुलीसाठी मिळाले. याचा परिणाम हा करवसुलीवर झाला आहे.

# अनाधिकृत फ्लेक्सने बिघडवले कोथरूडचे सौंदर्य!

## आगामी वर्षाचा आराखडा 1005 कोटींचा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांनी भेलके चौकात तब्बल अठरा फ्लेक्स उभे केले आहेत. राजकीय नेत्यांचे वाढदिवस, जयंती, उत्सव, शुभेच्छापर फ्लेक्स उभे करण्यात आले असून जणू काही फ्लेक्स लावण्याची स्पर्धाच सुरू आहे की काय? असे चित्र चौकामध्ये दिसून येते.**

> अशा फ्लेक्समुळे कोथरूडच्या सौंदर्यात बाधा निर्माण होते. राजकीय नेत्यांचा पाठींबा असल्याशिवाय फ्लेक्स लागू शकत नाहीत. प्रत्येक फ्लेक्सवर कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्यांचे फोटो असतात, त्यामुळे अधिकारी कारवाई करायला धजावत नाहीत. मोठ्या पदावर असलेल्या राजकीय नेत्यांनी कार्यकर्त्यांना समजावून सांगितले पाहिजे की, फ्लेक्स लावून माणूस मोठा होत नसतो.
> - सुनील महाजन, अध्यक्ष-कोथरूड नाट्य परिषद.

> रस्त्यावर फिरायला गेलं की निसर्ग कमी आणि फ्लेक्स जास्त दिसतात. मोठ -मोठे फ्लेक्स लावलेलं असतात,त्यावर दहा पंधरा फोटो असलेले फ्लेक्स तोंडावर आपटतात.सध्या शहरात अनाधिकृत फ्लेक्स मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. राजकीय नेते यामधून स्वताचे प्रदर्शन करत आहेत. उमद्या राजकीय नेत्यांचे प्रदर्शन अनाधिकृत फ्लेक्समधून केले जात आहे. पुणेकरांनी मतदान पेटीतून अशा लोकांना धडा शिकवायला हवा.
> - विनिता देशमुख, जेष्ठ पत्रकार, माहिती अधिकार कार्यकर्त्या



महापालिकेच्या दिशादर्शक फलकावर काही फ्लेक्स लावल्याने नवीन वाहनचालकांना हे दिशादर्शक फलक दिसत नाहीत. यासह महर्षी कोथरूड क्षेत्रीय कर्वे पुतळा चौकात देखील अशीच परिस्थिती असून या ठिकाणी पदपथावर लाकडी बांबू लावून फ्लेक्स उभे केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात देखील अशीच परिस्थिती आहे. यामुळे पादचाऱ्यांना पदपथावर चालणे मुश्कील झाले आहे.

कोथरूड भाग उच्चभ्रू म्हणून ओळखला जातो. स्थानिक रहिवाशांना फ्लेक्स मुळे पदपथावरून चालणे, फ्लेक्सच्या मागील रस्ता न दिसणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. फ्लेक्समुळे कोथरूडच्या सौंदर्यात बाधा येत असून शहराचे विद्रूपिकरण होत आहे. याकडे प्रशासन सजग नागरिकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# रावेत-निगडी पुलाला 'गती'!

## आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा: सहा महिन्यात काम होणार पूर्ण

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी : बहुप्रतीक्षित रावेत ते निगडी उड्डाणपुलाच्या उर्वरित कामाला अखेर महापालिका प्रशासनाकडून सुरूवात झाली आहे. या पुलाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करावे. त्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिकेतून कार्यवाही करावी, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निगडीच्या भक्ती शक्ती चौकापासून ते किवळे येथील मुकाई चौकापर्यंतचा बीआरटीएस मार्ग विकसित करीत आहे. यामुळे निगडी, आकुर्डी, भोसरी,MIDC व आसपासच्या परिसरातील लोकांना पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग, मुंबई-बंगलूरू महामार्गाकडे व किवळेला लवकर पोहोचता येईल. तसेच, रावेत, किवळे परिसरातील लोकांना पुणे- मुंबई महामार्ग, निगडी व इतर ठिकाणी लवकर पोहोचता येणार आहे.

पुलास अडथळा ठरणारे तेथील उच्चदाब विद्युत वाहकतारा व टॉवर हटविण्याचे काम डिसेंबर अखेर पूर्ण करण्यात आले आहे. तसेच येथील रेल्वेच्या उच्च दाब विद्युत वाहिन्या स्थलांतरित करणेचेही काम पूर्ण करण्यात आले आहे. निगडी भक्ती शक्ती चौक ते रावेतच्या मुकाई चौक या 45 मीटर रस्त्यावर निसर्ग दर्शन सोसायटी येथे रेल्वे लाईनवर उड्डाणपुलाचे उर्वरित काम पूर्ण करण्यात येणार आहे. हा बीआरटीएस मार्ग सुरू करण्यासाठी या पुलाची नितांत गरज होती, अशी माहिती प्रकल्प विभागाचे सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे यांनी दिली.



> **रावेत ते निगडी या उड्डाणपुलामुळे शहरातील वाहतूक सुरळित होण्यास मदत होणार असून, निगडी प्राधिकरण, तसेच भक्ती शक्ती चौकातील वाहतुकीची कोंडी दूर होणार आहे. त्याचा शहरातील व शहराबाहेरील वाहतुकीसाठी फायदा होईल. तसेच, हा उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर या मार्गावर बीआरटीएस बससेवा सुरू होऊ शकणार आहे. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे.**
> **-महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



# बगाड यात्रेनिमित्त हिंजवडीतील वाहतुकीत बदल

## आज दुपारी बारा ते रात्री दहा वाजेपर्यंत असणार आहेत बदल

।पुणे पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी येथील ग्रामदैवत म्हातोबा देवाची यात्रा गुरुवारी (दि. 6) होणार आहे. यानिमित्त दुपारी चार वाजता पारंपरिक बगाड मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत सुमारे 40 ते 50 हजार भाविक उपस्थित राहणार आहेत. त्यानिमित्त हिंजवडी आणि वाकड वाहतूक विभागाअंतर्गत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. हे बदल गुरुवारी दुपारी बारा ते रात्री दहा वाजेपर्यंत असणार आहेत.**

मार्ग – विप्रो सर्कल फेस 2 ते वाकड नाका जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद आहे

पर्यायी मार्ग – विप्रो सर्कल फेज चौकाकडून शिवाजी चौक मार्गे वाकड नाका येथे जाणारी वाहतूक टाटा टी जंक्शन येथून लक्ष्मी चौक भुमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल.

मार्ग – जॉमेट्रीक सर्कल ते वाकड नाका जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद

पर्यायी मार्ग – जॉमेट्रीक सर्कल चौकाकडून शिवाजी चौक मार्गे वाकड नाकाकडे जाणारी वाहतूक मेझा नाईन चौकाकडून लक्ष्मी चौक भुमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल.

मार्ग – शिवाजी चौक ते भुमकर चौक कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंद

पर्यायी मार्ग – शिवाजी चौकाकडून भुमकर चौकाकडे जाणारी वाहतूक इंडियन ऑइल चौक मार्गे वाकडगाव येथून इच्छित स्थळी जाईल

मार्ग – इंडियन ऑइल चौक ते विनोदे वस्ती चौकाकडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – इंडियन ऑइल चौकाकडून कस्तुरी चौक मार्गे विनोदी वस्ती कडे जाणारी वाहतूक शिवाजी चौक व वाकडगाव मार्गे इच्छित स्थळी जाईल.

मार्ग – विनोदे वस्ती कॉर्नर ते इंडियन ऑईल चौक, वाकड नाका, शिवाजी महाराज चौकाकडे जाणारा रस्ता बंद आहे

पर्यायी मार्ग – विनोदे वस्ती कॉर्नर येथून लक्ष्मी चौक व भुमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जाता येईल

मार्ग – इंडियन ऑइल चौक ते वाकड नाका सयाजी अंडरपासकडे जाणारा रस्ता बंद आहे

पर्यायी मार्ग – इंडियन ऑइल चौक मार्गे वाकड नाका सयाजी अंडरपासकडे जाणारी वाहतूक वाकड ब्रिज वाकडगाव मार्गे येथे स्थळी जाईल.

मार्ग – मुळा नदी ब्रिज पंक्चर ते वाकड नाका (भुजबळ चौका)कडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – मुळा नदी ब्रिज पंचर येथून सर्विस रोडने वाकड नाक्याकडे जाणारी वाहतूक महामार्गाने सरळ भूमकर चौकातून इच्छित स्थळी जाईल

मार्ग – वाकड नाका सातारा लेन ते सूर्या अंडरपास मार्गे छत्रपती शिवाजी चौकाकडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – वाकड नाका सातारा लेणे भुमकर चौकातून छत्रपती चौक व महामार्गावरून सरळ राधा चौकातून यु टर्न घेऊन महामार्गावरून भुमकर चौकातून इच्छित स्थळी जाता येईल

मार्ग – भुमकर चौक भुमकर वस्ती रोड मार्गे विप्रोफेज तीन कडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – भुमकर चौक येथून मारुंजी वाय जंक्शन भूमकर वस्ती मार्गे शिवाजी महाराज चौकाकडे जाणारी वाहतूक विनोदे वस्ती रोडने लक्ष्मी चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल

मार्ग – विनोदे वस्ती चौक ते कस्तुरी चौकाकडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – विनोदे चौकातून कस्तुरी चौकाकडे जाणारी वाहतूक भूमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल



मार्ग – मारुंजी वाय जंक्शन चौक ते कस्तुरी चौकाकडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – मारुंजी वाय जंक्शन येथून लक्ष्मी चौक मार्गे इच्छित स्थळी जाता येईल

मार्ग – जॅंगवॉर शोरूम ते सयाजी अंडरपासकडे जाणारा सर्विस रस्ता बंद आहे

पर्यायी मार्ग – बेंगलोर महामार्गाने सातारा लेणे किंवा काळाखडक येथून डांगे चौक मार्गे इच्छित स्थळी जाता येईल

मार्ग – मानकर चौक ते वाकड गाव चौकाकडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – मानकर चौकातून उजवीकडे वळून छत्रपती चौक, कस्पटे वस्ती मार्गे इच्छित स्थळी जाता येईल

मार्ग – उत्कर्ष चौक ते वाकड गावाकडे जाणारा मार्ग बंद आहे

पर्यायी मार्ग – उत्कर्ष चौकातून डावीकडे वळून छत्रपती चौक, कस्पटे वस्ती मार्गे इच्छित स्थळी जाता येईल

## संपादकीय »

# निर्यातधोरणाला हवे कार्यवाहीचे बळ

***निर्यातीला प्रोत्साहन देणे, त्याकरता उद्योजकांसह सर्व घटकांना प्रवृत्त करण्याच्या हेतूने देशाचे आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण जाहीर केले आहे. ते तळागाळापर्यंत पोहोचवून त्याद्वारे परकी चलनाची गंगाजळी वाढवण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना केल्या पाहिजेत.***

वाणिज्य आणि व्यापार मंत्री पियुष गोयल यांनी ३१ मार्च २०२३ रोजी भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण-२०२३ जाहीर केले. वास्तविक आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण हे पंचवार्षिक स्वरूपाचे असते, मात्र गेले तीन वर्षे हे धोरण हे नव्याने मांडण्यात आले नव्हते. याच तरतुदीला छेद देत नवीन आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण-२०२३ हे कालातीत असेल. त्यावर काळाचे कुठलेही बंधन न राहता वेळोवेळी गरजेनुसार त्यामध्ये बदल केले जातील, असे महत्त्वाचे सूतोवाच गोयल यांनी धोरण जाहीर करताना केले आहे. हे नवीन धोरण महत्त्वाचे आहे. त्याची पार्श्वभूमी पाहता सध्या जागतिक मंदीच्या काळात आणि पुढील वर्षी येऊ घातलेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) मंत्री परिषदेच्या अनुषंगाने तसेच भारतात प्रस्तावित असलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुद्धा हे धोरण महत्त्वाची भूमिका बजावेल.

जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक देश हा परकी चलनाची गंगाजळी वाढविण्याकडे लक्ष केंद्रित करत आहे. त्याच मार्गावर लक्ष केंद्रित करत भारत सरकारने मोठ्या प्रमाणात निर्यातवाढीचे लक्ष्य या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणातून मांडले आहे. भारताने २०३०पर्यंत दोन ट्रिलियन डॉलर निर्यातीचे लक्ष्य ठेवले आहे. यंदाच्या वर्षी, म्हणजेच २०२३मध्ये ७७०अब्ज डॉलर निर्यातीचे लक्ष्य आहे.


आता करपरतावा सवलत

हे आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण अनेक मुद्यांच्या संदर्र्भात चर्चेत आहे. पूर्वी प्रत्यक्ष निर्यात अनुदान देऊन निर्यातीला प्रोत्साहन दिले जात होते. आता त्याऐवजी कर परतावा सवलत निर्यातीसाठी अंगीकारण्यात येणार आहे, असे या धोरणाच्या निमित्ताने गोयल यांनी सांगितले. पण याचा निर्यातदारांना फायदा होईल का? उपलब्ध असलेले अनुदान मिळवण्यासाठी मुळातच निर्यातदारांना वणवण करावी लागते; तर उद्या त्यांनी केलेल्या खर्चाच्या बाबतीतला परतावा नंतर मिळण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतील, याचा प्रश्न अनेकांच्या मनात निश्चित निर्माण झाला आहे.अनेक अभ्यासकांच्या मते नव्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणाला सरकारने अनेक वर्षे लावली तर या धोरणातील बदलांना किती वेळ लागेल, हेही सांगता येत नाही. या धोरणामध्ये कुठलाही कालावधी नमूद नसल्याने ही शंका रास्त ठरते.




# प्रवाहपतित पत्रकारिता अन उथळ नव पत्रकार !

माध्यमांचे स्वरूप बदलले की त्यात काम करणाऱ्या लोकांनाही आपल्या कामाची दिशा बदलावी लागत असते. बदलत्या काळासोबत ज्यांना जुळवून घेता येत नसते त्यांना काळ प्रवाहाच्या बाहेर फेकत असतो. माध्यमांना बदलत्या तंत्र ज्ञानाशी स्पर्धा करण्यासोबतच मार्केटिंग मध्ये सुद्धा अग्रेसर राहण्याची गरज असते त्यासाठी बाजारातील स्पर्धकांच्या एक पाऊल पुढे कसे राहता येईल याचे नियोजन करावे लागते. नव्वदच्या दशकातील टीव्ही आठवून बघा ,आणि आताच्या काळातील तेच सरकारी दूरदर्शन बघा . स्थिती एकदम बदलली आहे. त्याहीपेक्षा जास्त बदल मुद्रित माध्यमांच्या क्षेत्रात झालेले दिसतात.



वृत्तपत्रे कार्यालये,मनुष्यबळ आणि यंत्रणा या बाबतीत खूपच पुढे गेली आहेत. इंटरनेट नसण्याचा काळ आणि सध्याचा काळ यांची कोणत्याच बाबतीत तुलना होऊ शकणार नाही अश्या अवस्थेत वृत्तपत्रे आली आहेत. तंत्रज्ञान,कार्यपद्धती बदलली की त्यात राबणाऱ्या लोकांना मानसिकता सुद्धा बदलावी लागते.

मानसिकता बदलणे म्हणजे कर्तव्याच्या नावावर पाट्या टाकणे ,अगदी "दिन जावं पैसा आव" असे करणे नव्हे. जे काम आपल्या वाट्याला आले असेल ते करण्यासाठी पूर्ण झोकून देणे आणि आपण केलेल्या कामाचे बरे,वाईट परिणाम सहन करण्याची तयारी ठेवणे हा मानसिकता बदल असू शकतो. अलीकडे त्याचे संदर्भ नव्या पिढीच्या पत्रकारांनी आपल्या कामातून बदलून टाकले आहेत. पूर्वीपेक्षा वृत्तपत्रे अधिक आधुनिक आणि खर्चिक झाली आहेत , पत्रकारांच्या पगाराच्या बाबतीत सुद्धा सुधारणा झाल्या आहेत मात्र मिळणाऱ्या मोबदल्यात शंभर टक्के परतावा देण्याची प्रवृत्ती कमी होताना दिसत आहे. त्याचा परिणाम असा झाला की विदर्भात गेल्या वीस वर्षात शोध पत्रकारिता,सामाजिक पत्रकारिता नामशेष झाली आहे. पायाला भिंगरी असलेले पत्रकार आता शहरात आणि गावठी मिळेनासे झाले आहेत. सारी दुनिया मोबाईलच्या माध्यमातून मुठीत आल्यानंतर मेहनती पत्रकार सुद्धा रेडिमेड मजकुराच्या आहारी गेले आहेत.

सोशल मीडियावर रेडिमेड मजकूर उपलब्ध होणे ही आजच्या पत्रकारितेची गरज नाही ती कुणीतरी स्वतःच्या सुविधेसाठी निर्माण केलेली व्यवस्था आहे. कार्पोरेट जगतात त्याला "पीआर" असे संबोधले जाते परिणामी आजची बहुतांश माध्यमे या पीआरच्या जाळयात ओढली गेली आहेत. कॉर्पोरेट कंपन्या,मोठ्या शिक्षण संस्था आणि सरकारी अनुदानावर काम करणाऱ्या कथित सामाजिक संस्था त्यांना हवा तसा मजकूर तयार करून मेल करतात आणि दुर्दैवाने त्यातील कानामात्रा सुद्धा न बदलता तो मजकूर दुसऱ्या दिवशीच्या अंकात प्रेषित होताना आपण बघत असतो. भांडवलशाही किंवा कॉर्पोरेट जगत त्याला अपेक्षित असा मजकूर श्रमिकांच्या सुद्धा माध्यमातून अश्या पद्धतीने छापून आणू शकतो हे अनेकदा सिद्ध झाले आहे. अलीकडे जाहिरात पार्टीची बातमी या नावाचा प्रकार अतिशय प्रभावी बनला असून संपादकीय विभागापेक्षा मार्केटींग विभाग शिरजोर बनला आहे कारण त्याचे उत्पादक मूल्य अधिक असते.

जिल्हास्तरावरील बातमीदार आणि उपसंपादक वर्षानुवर्षे केवळ कार्यक्रमाचे वृत्तांकन करण्यात व्यस्त आहेत. बातमीमागील बातमी शोधण्याची दृष्टी त्यांनी वापर न केल्यामुळे गमावली आहे. अलीकडे म्हणूनच पाच पन्नास लोकांच्या उपस्थितीतले कार्यक्रम सुद्धा सोहळे होतात आणि दहा पाच लोक जिथे रक्तदान करतात ते शिबीरही भव्य रक्तदान शिबीर म्हणून पार पडत असते. ज्या मजकुराचे पत्रक काढले तरी ते छापून येऊ शकते त्याबाबत अलीकडे सगळ्याच क्षेत्रातील लोक पत्रकार परिषदा घ्यायला लागले आहेत. कोणत्याही विषयावर पत्रपरिषद घेतली की त्याची बातमी छापणे बंधनकारक असल्याचा गोड गैरसमज आयोजकांना निर्माण करून देण्यात काही पत्रकार यशस्वी झाले आहेत.

# पिवळ्या सुगरणीचे सौंदर्य

**निसर्गात सामान्यपणे आढळणाऱ्या प्रजाती एक दिवस आपल्या नकळत ‘असामान्य’ बनतात आणि मग त्यांच्याप्रती आपण हळहळ व्यक्त करत बसतो. अशाच काही असामान्य प्रजातींचा आपण आढावा घेतला. आता मी तराई प्रदेशातील अशाच एका सुंदर सुगरणीची माहिती करून देणार आहे.**

भारतात सुगरण पक्ष्यांच्या सामान्य सुगरण किंवा भारतीय सुगरण, स्ट्रीक सुगरण, काळ्या छातीची सुगरण आणि पिवळी सुगरण म्हणजेच फीन सुगरण अशा चार प्रजाती आढळतात. २०१६ मध्ये बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीतर्फे (बीएनएचएस) भारतातील सुगरण पक्ष्यांचे एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये संपूर्ण देशभरात केवळ सहा हजार ३५४ सुगरण पक्षी आढळून आले होते. यापैकी एक हजार १३८ पक्षी महाराष्ट्रात आढळले होते.

या पक्ष्यांचे यापूर्वी असे सर्वेक्षण करून संख्या निश्चित झाली नव्हती. त्यामुळे ही संख्या पूर्वीच्या तुलनेत कमी झाली, असे छातीठोकपणे म्हणता येत नसले, तरीही एवढ्या कमी संख्येवरून संपूर्ण देशातील सुगरण पक्ष्यांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. त्यातही पिवळी सुगरण किंवा फीन सुगरण हा पक्षी तर खूपच कमी संख्येत शिल्लक राहिल्याचे दिसून आले आहे. यालाच



हिंदीत ‘बडा बया’ किंवा ‘पहरी बया’ असेही म्हटले जाते.

या पक्ष्याचा शोध १८८९ मध्ये ओटस याने लावला. त्या वेळी त्याने याला ‘ईस्टर्न बया’ असे नाव दिले. पुढे १९२५ मध्ये फ्रँक फीन आणि ई.सी. स्टुअर्ट बेकर यांनी या पक्ष्याचा अधिक अभ्यास केला. तेव्हापासून याला ‘फीन बया’ असे संबोधण्यात येते. तो मूळतः गंगा आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात आढळून येतो. केवळ नेपाळ आणि भारतात तराई या गवती प्रदेशातील दलदल क्षेत्रात असणाऱ्या उंच गवतात तो आढळतो; पण मागील ६० वर्षांमध्ये दलदलीचे प्रदेश संपून त्यावर मनुष्यवस्त्या उभ्या झाल्याने आता त्यांची संख्या या प्रदेशातही कमी झाली आहे.

संपूर्ण जगात यांची संख्या केवळ ९९९ शिल्लक राहिल्याचे जाहीर करण्यात आले. भारतात पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांनी १९३४ आणि १९५४ मध्ये या पक्ष्यांचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम हाती घेतली होती; पण त्यात त्यांना यश आले नाही. अखेर १९५९ मध्ये कुमाऊच्या गवती अधिवासात त्यांना फीन सुगरण पक्ष्यांचा शोध लागला. यामध्ये दोन प्रजाती आहेत. एक ‘प्लॉसेस मेगा रेंचस’ ही प्रजाती उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम नेपाळमध्ये आढळते; तर ‘प्लॉसेस सलीमअली’ ही प्रजाती पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये आढळते. आज संपूर्ण जगात त्यांची संख्या केवळ एक हजारच्या आसपास असल्याचे म्हटले जाते. यापैकी भारतात केवळ ५०० पक्षी असल्याचे म्हटले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वाळू माफियांना लगाम बसणार!

## ग्राहकांना स्वस्त दरात रेती मिळणार, शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शिंदे-फडणवीस सरकारने वाळू उत्खननाच्या धोरणावर मोठा निर्णय घेतला आहे. यानुसार यापुढे ग्राहकांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध करून देण्यासाठी वाळूचा लिलाव बंद होणार आहे. मंत्रिमंडळाने बुधवारी (५ एप्रिल) सुधारित रेती धोरणास मान्यता दिली आहे. वाळूसह या बैठकीत एकूण नऊ निर्णय घेण्यात आले आहेत.**

### धनाची रक्कम माफ करण्यात येईल

**राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी आणि अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती धोरण तयार करण्यात आल्याचं सरकारने सांगितलं. या धोरणानुसार प्रायोगिक तत्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये (रुपये १३३ प्रति मेट्रीक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आला आहे. यात स्वामित्व धनाची रक्कम माफ करण्यात येईल.**



राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी आणि अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती धोरण तयार करण्यात आल्याचं सरकारने सांगितलं. या धोरणानुसार प्रायोगिक तत्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये (रुपये १३३ प्रति मेट्रीक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आला आहे. यात स्वामित्व धनाची रक्कम माफ करण्यात येईल.

याशिवाय जिल्हा खनीज प्रतिष्ठाण निधी व वाहतूक परवाना सेवा शुल्क इत्यादी खर्चदेखील आकारण्यात येतील. वाळुचे उत्खनन, उत्खनननानंतर वाळुची डेपोपर्यंत वाहतूक, डेपोची निर्मिती आणि व्यवस्थापन यासाठी एक निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल. यातून वाळू किंवा रेती उत्खनन करण्यात येईल. ही रेती शासनाच्या डेपोमध्ये नेली जाईल व तिथून या रेतीची विक्री करण्यात येईल.

नदी पात्रातील वाळु गटाचे निरिक्षण करण्याची कार्यवाही तहसिलदारांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समिती करेल. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरिय वाळु संनियत्रण समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वाळू गट निश्चित करून, त्या गटासाठी ऑनलाईन ई-निविदा पद्धती जाहीर करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीला शिफारस करेल.

जिल्हास्तरीय संनियत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील आणि या समितीत मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त, अपर जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग तसेच प्रादेशिक परिवहन अधिकीर, भू-विज्ञान व खनीकर्म विभाग, भूजल सर्वेक्षण तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी असतील. ही समिती वाळू डेपोमध्ये वाळू साठा उपलब्ध करून घेण्यासाठी वाळू गट निश्चित करतील. तसेच राष्ट्रीय हरिल न्यायधिकरणाच्या निर्देशांचे पालन होईल, याची दक्षता घेईल.

---

## शिवाजी पार्क परिसरातील रहिवासी धुळीमुळे हैराण

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबईतील दादरच्या शिवाजी पार्क मैदानातून होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांना दमा आणि इतर श्वसनाचे आजार जडत आहेत. त्यामुळे रहिवाशांनी या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे धाव घेतली आहे.

मुंबई महापालिकेच्या शिवाजी पार्क नूतनीकरण आणि धुळीचे प्रदूषण कमी व्हावे यासाठी हिरवळ तयार करण्याच्या प्रकल्पाचे तीन तेरा वाजल्याचं चित्र आहे. त्यामुळे पार्कात सभा घेणाऱ्या राजकीय पक्षांना रहिवाशांना होणारा त्रास कळणार का? हा प्रश्न शिवाजी पार्क परिसरातील रहिवाशांनी विचारला आहे. पाहूया धुळीचे साम्राज्य पसरलेल्या शिवाजी पार्कचा रिपोर्ट

दृश्यांमध्ये तुम्ही जे पाहताय हे कुठलं वादळ नसून शिवाजी



पार्कवर उडणारी धूळ आहे... शिवाजी पार्क परिसरातील रहिवासी धुळीमुळे मागील अनेक वर्षांपासून त्रस्त आहेत. या धुळींच्या कणामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुलं यांना श्वसनाचे आजार जडले आहेत.

शिवाजी पार्क धूळमुक्त व्हावं यासाठी कंत्राट काढण्यात आले. रेन वॉटर हार्वेस्टिंग, तुषार सिंचन यासारखे प्रकल्प हाती घेऊन शिवाजी पार्कवर हिरवळ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र शिवाजी पार्कवर ना हिरवळ आली, नाही शिवाजी पार्क धूळमुक्त झालं. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार करण्याची वेळ इथल्या रहिवाशांवर आली.

---

## "गुंडांचं सरकार महाराष्ट्रात राहू देणार नाही.."

### रोशनी शिंदे मारहाण प्रकरण: आदित्य ठाकरेंची ठाण्यात गर्जना



। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

रोशनी शिंदे मारहाण प्रकरणी पोलीस काय करत आहेत? असा प्रश्न विचारत महाविकास आघाडीने आज ठाण्यात मोर्चा काढला आहे. आम्ही पोलीस आयुक्तालयाला कुलुप लावणार आहोत असाही निर्धार यावेळी राष्ट्रवादीचे नेते आनंद परांजपे यांनी बोलून दाखवला आहे. तसंच रोशनी शिंदे यांना न्याय मिळालाच पाहिजे असंही या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी म्हटलं आहे. आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड यांच्यासह प्रमुख नेते या मोर्चात सहभागी झाले आहेत. गुंडाचं सरकार आम्ही महाराष्ट्रात राहू देणार नाही असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे.

### आदित्य ठाकरेंनी काय म्हटलं आहे?

रोशनी शिंदे यांना मारहाण केली जाते हा अत्यंत घृणास्पद प्रकार ठाण्यात घडला आहे. आमचा लढा अन्यायाच्या विरोधात आहे. महिलांवर अत्याचार होत आहेत. ठाण्याचे पोलीस आयुक्त हे बेपत्ता आहे. गुंडांचं सरकार आलं आहे आम्ही ते सरकार महाराष्ट्रात राहू देणार नाही असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**जितेंद्र आव्हाड यांनी नेमकं काय म्हटलं आहे?**

मोर्चा किती भव्य आहे ते महत्त्वाचं नाही तर मोर्चा कशासाठी निघतोय ते महत्त्वाचं आहे. जो कायदा पोलिसांनी पाळला पाहिजे तो कायदा पायदळी तुडवला जातो आहे. आयपीएस होताना पोलीस शपथ घेतात की निःपक्षपातीपणाने कारभार करेन. ते कधीही दिसतच नाही. एका समूहावर कायम अन्याय करण्याची प्रवृत्ती दिसते आहे. त्यामुळेच आम्ही हा मोर्चा काढला आहे असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.

**नरेश म्हस्केंनी काय म्हटलं आहे?**

नरेश म्हस्के यांनी मोर्चावर कडाडून टीका केली आहे. ज्या जितेंद्र आव्हाडांनी उद्धव ठाकरेंचा फोटो खड्डयात बुडवला होता. ज्या जितेंद्र आव्हाडांनी बाळासाहेब ठाकरेंवर चुकीच्या शब्दांमध्ये टिपण्णी केली होती अशा आव्हाडांना सोबत घेऊन मोर्चा काढला जातो आहे. उद्धव ठाकरेंकडे माणसं नाहीत ठाण्यात आणायला त्यामुळेच मुंबई, रायगड या ठिकाणांहून माणसं आणली गेली आहेत. जो खोटा आव आणत आहेत तो बुरखा फाटला आहे. मारहाण झालेली नाही असं सिव्हिल रूग्णालयाने सांगितलं आहे त्यामुळे हे असत्य ठरले आहे असंही नरेश म्हस्के यांनी म्हटलं आहे.

# कोर्टाचा १४ विरोधी पक्षांना दणका

## ईडी, सीबीआयची ताकद वाढणार?



।नवी दिल्ली महाईन्यूज।

ईडी, सीबीआय या तपास यंत्रणांच्या विरोधात देशातल्या १४ विरोधी पक्षांनी मिळून एक याचिका दाखल केली होती. या याचिकेला फेटाळून सर्वोच्च न्यायालयाने विरोधकांना दणका दिला आहे. तपास यंत्रणांचा गैरवापर होत असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला होता.

सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 14 विरोधी पक्षांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला. या याचिकेत केंद्रीय अन्वेषण ब्यूरो (CBI) आणि अंमलबजावणी संचालनालय (ED) सारख्या केंद्रीय तपास संस्थांचा "मनमानी वापर" होत असल्याचा आरोप करण्यात आला होता.विरोधी नेत्यांना अटक, रिमांड आणि जामीन यावर नियंत्रण ठेवणाऱ्या मार्गदर्शक तत्वांची मागणीही विरोधकांनी केली होती.काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी ही याचिका दाखल केली होती. विरोधी पक्षाच्या नेत्यांना सातत्याने लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेस, आप, डीएमके, आरजेडी, बीआरएस, टीएमसी यांच्यासह १४ राजकीय पक्षांचा यामध्ये समावेश आहे.


# सीमा वाद पुन्हा पेटणार!

## कर्नाटकाचे मुख्यमंत्री बोम्मईंनी दिला एकनाथ शिंदे यांना थेट इशारा

।नवी दिल्ली महाईन्यूज।

**महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या 865 गावातील मराठी भाषिक गावातील नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या बेळगाव कारवार कलबुर्गी व बिदर जिल्ह्यातील बारा तहसील मधील 865 गावांना योजनेचा फायदा होणार आहे. मात्र या योनजनेवर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी याबाबत महाराष्ट्र सरकारला इशारा दिला. हा प्रकार त्वरित थांबवावा, असे बोम्मई यांनी सांगितले. बसवराज बोम्मई म्हणाले, मी महाराष्ट्र सरकारला ती योजना मागे घेण्याचे आवाहन करतो. तसे झाले नाही तर आम्हीही अशा योजना सुरू करू.



बोम्मई यांनी ट्विटच्या माध्यमातून कर्नाटकातील सीमावर्ती गावांतील लोकांना विमा देण्याच्या नावाखाली महाराष्ट्र सरकार त्यांच्याकडून ते लोक महाराष्ट्रात येत असल्याची प्रतिज्ञा पत्रे लिहून घेत असल्याचा दावा बोम्मई यांनी केला आहे.तसेच हे निषेधार्ह असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र सरकारने हे वर्तन असेच चालू ठेवल्यास महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात राहणाऱ्या कन्नड लोकांच्या संरक्षणासाठी कर्नाटक सरकारही अशीच विमा योजना राबवेल.

### दोन्ही राज्यांमधील संबंध बिघडवण्याचा हा प्रयत्न

**» बोम्मई म्हणाले की, कर्नाटक-महाराष्ट्र सीमा वाद सुप्रीम कोर्टात आहे, पण महाराष्ट्र सरकार दोन्ही राज्यांच्या सीमा भागात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. कर्नाटक सीमेवरील लोकांना विमा योजनेचा लाभ देण्याचा आदेश योग्य नाही. तसेच दोन्ही राज्यांमधील संबंध बिघडवण्याचा हा प्रयत्न आहे.**



बोम्मई म्हणाले की, कर्नाटक-महाराष्ट्र सीमा वाद सुप्रीम कोर्टात आहे, पण महाराष्ट्र सरकार दोन्ही राज्यांच्या सीमा भागात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. कर्नाटक सीमेवरील लोकांना विमा योजनेचा लाभ देण्याचा आदेश योग्य नाही. तसेच दोन्ही राज्यांमधील संबंध बिघडवण्याचा हा प्रयत्न आहे. दरम्यान गेल्या वर्षी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीमाप्रश्नाबाबत कोणताही संभ्रम निर्माण न करण्याचे मान्य केले होतो.

# आरजेडीमुळे बिहारमध्ये पुन्हा 'जंगलराज'

## रामनवमीच्या दंगलीवरून अमित शाह विरुद्ध जेडीयू-आरजेडी आमनेसामने

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रामनवमीच्या दिवशी बिहारमध्ये काही ठिकाणी हिंसक प्रतिक्रिया उमटल्या. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना सासाराम येथील दौरा रद्द करावा लागला होता. या हिंसाचाराच्या प्रकारावरून भाजपाने सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. जनता दल (यु) आणि राष्ट्रीय जनता दलाने एकमेकांशी हातमिळवणी केल्यानंतर राज्यात दंगलीचे प्रकार वाढले आहेत, अशी टीका भाजपाकडून करण्यात आली आहे.**

केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी २ एप्रिल रोजी नवादा येथील जाहीर सभेत सरकारवर आरोप करीत जनतेला आवाहन केले की, "भाजपा २०२४ रोजी पुन्हा सत्तेत आल्यानंतर आम्ही दंगलीचे प्रकार गाडून टाकू." तसेच केंद्रीय गृहखात्याने बिहारचे राज्यपाल आर. व्ही. आर्लेकर यांना पत्र लिहून सासाराम आणि बिहारशरीफ येथील दंगलीबाबत कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्याची विनंती केली.

राष्ट्रीय जनता दलाचा सरकारमध्ये समावेश असल्यामुळेच दंगली घडत असल्याचा आरोपही भाजपाने केला आहे. ज्यामुळे सरकारवर 'जंगलराज' अशी टीका केली जात आहे. कमकुवत कायदा व सुव्यवस्थेसाठी 'जंगलराज' असे नाव ठेवले जाते. लालू प्रसाद यादव बिहारचे मुख्यमंत्री असल्यापासून राष्ट्रीय जनता दलावर 'जंगलराज'ची टीका होत आहे. अमित शहा यांनीच





मैदानात उतरून सरकारविरोधात शड्डू ठोकल्यामुळे आता बिहारमधील भाजपाचे नेतेदेखील 'महागठबंधन' सरकारवर तुटून पडत आहेत. राज्यसभेचे खासदार आणि माजी उपमुख्यमंत्री सुशील कुमार मोदी म्हणाले की, "कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यात नितीश कुमार १७ वर्षांत पहिल्यांदाच अपयशी ठरले आहेत. बिहारशरीफ आणि सासाराम येथे हिंसाचाराच्या ठिकाणी अर्धसैनिक दल तैनात करण्यात सरकारला उशीर झाला."भाजपाच्या ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि प्रवक्ते निखिल आनंद यांनी बिहार सरकारवर टीका केली. ते म्हणाले, "मुख्यमंत्री नितीश कुमार हे १४ व्या शतकातील मोहम्मद बिन तुघलक यांच्यासारखा कारभार करताना दिसत आहेत. त्यामुळे बिहारमध्ये पुन्हा एकदा 'जंगलराज' आल्याचे दिसत आहे. ज्या प्रकारे तुघलकच्या कारभारात समन्वयाचा अभाव होता. त्याप्रमाणेच नितीश कुमार यांच्या सरकारमधील जिल्हा प्रशासन आणि राज्याच्या सचिवालयामध्ये काहीच ताळमेळ नाही. रोहतास आणि नालंदा या ठिकाणी निर्बंध लावल्याचे सुरुवातीला सांगण्यात आले होते. पण नंतर अचानक निर्बंध मागे घेतले. प्रशासनाच्या या गोंधळामुळे दंगलीची परिस्थिती निर्माण झाली."

नितीश कुमार यांनी अमित शहा यांच्या टीकेला थेट उत्तर न देता म्हटले,

# देशात गडद होतंय कोरोनाचं संकट

। गुवाहाटीः ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



मागील अनेक दिवसांपासून मुंबईसह देशभरात कोरोनाच्या नव्या रुग्णांची झपाट्याने वाढ होत आहे. एकाच दिवसात 1400 हून अधिक कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, गेल्या 24 तासांत देशात कोरोनाचे 4,435 रुग्ण आढळले आहेत.

मागील अनेक दिवसांपासून मुंबईसह देशभरात कोरोनाच्या नव्या रुग्णांची झपाट्याने वाढ होत आहे. एकाच दिवसात 1400 हून अधिक कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, गेल्या 24 तासांत देशात कोरोनाचे 4,435 रुग्ण आढळले आहेत. प्रदीर्घ काळानंतर देशात एकाच दिवसात चार हजारांहून अधिक कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. या वाढत्या रुग्णांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. केंद्राकडून सर्व राज्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

लसीकरणाचा आकडा 220.65 कोटी पार

आतापर्यंत देशात कोरोना लसीचे 220.65 कोटीहून अधिक डोस देण्यात आले

### 23 हजारांहून अधिक सक्रिय रुग्ण

**» देशातील सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या आता 23 हजार 91 झाली आहे. मंगळवारी 21 हजार 179 सक्रिय प्रकरणे होती.**



# रितिका श्रोत्रीचा पुन्हा रोमँटिक अंदाज..

अनेक चित्रपटांमधून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री रितिका श्रोत्री. आजवर साकारलेल्या बिनधास्त आणि बेधडक भूमिकांमुळे तिने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. मात्र 'सरी' चित्रपटात रितिका श्रोत्री एका वेगळ्याच भूमिकेत पाहायला मिळणार असून आजवरच्या भूमिकेपेक्षा ही तिची खूपच वेगळी भूमिका आहे. सोज्वळ, अभ्यासू आणि रोमँटिक 'दिया'चा हा अंदाज प्रेक्षकांना नक्कीच आवडेल ! आपल्या भूमिकेबद्दल रितिका श्रोत्री म्हणते, " सरीमधील दियाची भूमिका साकारणे, माझ्यासाठी समाधान देणारा अनुभव होता. कारण याआधीच्या माझ्या सर्व चित्रपटांमध्ये मी बहिर्मुख भूमिका साकारल्या आहेत. ज्यात मी खूपच बिनधास्त दिसली आहे. त्या मुलींना जे वाटते, ते त्या ठामपणे व्यक्त करतात. मात्र या चित्रपटात 'दिया' अशी आहे, जिला खूप काही वाटते, खूप काही बोलायचे आहे, परंतु ती अंतर्मुख असल्यामुळे ती आपल्या भावना व्यक्त करू शकत नाही. त्यामुळे ही व्यक्तिरेखा साकारणे माझ्यासाठी खूप वेगळा आणि सुंदर अनुभव आहे."कॅनरस प्रॉडक्शन प्रस्तुत, डॉ. सुरेश नागपाल, आकाश नागपाल निर्मित या चित्रपटाचे लेखन, संकलन दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील दिग्दर्शक अशोका के. एस. यांनी केले असून 'सरी'मध्ये रितिका श्रोत्रीसह अजिंक्य राऊत, पृथ्वी अंबर आणि मृणाल कुलकर्णी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या ५ मे रोजी 'सरी' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.



# रेखापासून वरुण धवनपर्यंत या स्टार्सनी प्रियांकाच्या 'CITADEL' या सिरीजच्या

बॉलिवूड अभिनेत्री प्रियांका चोप्रा आणि हॉलिवूड अभिनेता रिचर्ड मॅडेन त्यांच्या आगामी 'सिटाडेल' या सिरीजच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहेत. प्रियांका आणि रिचर्ड सध्या प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणाऱ्या या सिरीजच्या प्रमोशनसाठी भारतात आहेत.

मुंबईत त्याच्या प्रमोशनसाठी खास प्रीमियर आयोजित करण्यात आला होता. ज्यामध्ये रेखापासून वरुण धवन, नोरा फतेही ते अनुभव सिन्हा, नेहा धुपिया आणि चित्रपट जगतातील नामवंत कलाकार सहभागी झाले होते.

या कार्यक्रमात पोहोचलेल्या एव्हरग्रीन अभिनेत्री रेखाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रेखा नेहमीप्रमाणे सिल्क साडीत दिसली. ज्येष्ठ अभिनेत्री रेखाने तपकिरी रंगाची सिल्क साडी परिधान केली होती ज्यामध्ये ती खूपच सुंदर दिसत होती.

रेखाने पापाराझींना जोरदार पोज दिली आणि हात जोडून नमस्कार केले. तर अभिनेता वरुण धवन अतिशय फंकी आउटफिटमध्ये दिसला. त्याने बॅगी पँट, काळा टी-शर्ट आणि निळ्या रंगाचे स्टेटमेंट जॅकेट घातले होते.चित्रपट निर्माते मधुर भांडारकर आणि अनुभव सिन्हा यांनीही सिटाडेलच्या स्क्रिनिंगला हजेरी लावली होती.

# रश्मिकाचे पाच शहरात घरं?

टॉलीवूडचा पुष्पा प्रदर्शित झाला त्यातील श्रीवल्लीनं प्रेक्षकांवर आपली वेगळी छाप उमटवली होती. श्रीवल्ली फेम रश्मिकाचा आज जन्मदिवस. या अभिनेत्रीनं आता केवळ टॉलीवूडच नाहीतर बॉलीवूडमध्ये देखील स्वताची वेगळी ओळख निर्माण केल्याचे दिसून आले आहे. रश्मिकाची ओळख ही आता नॅशनल क्रश झाली आहे. रश्मिका नेहमी तिच्या स्टाईल आणि विनोदबुद्धीमुळे चर्चेत असते. तिच्या सौंदर्याचे अनेक दिवाने आहेत. या दाक्षिणात्य सौंदर्याने बॉलिवूडमध्येही पाऊल ठेवले आहे. तिचे चित्रपट, वैयक्तिक आयुष्य इत्यादींबद्दल तुम्हाला माहिती असेलच. पण तुम्ही तिच्या आलिशान घराची झलक पाहिली आहे का? आज तिच्या वाढदिवसानिमित्त आम्ही तुम्हाला तिच्या आलिशान घराची झलक देत आहोत.खरं तर, तिच्या लॅविश होम्सबद्दल बोलायचं झालं तर, यात अभिनेत्रीशी क्वचितच कोणी स्पर्धा करू शकेल. ज्या शहरांमध्ये तिची घरे आहेत त्यामध्ये मुंबई, बंगळुरू, हैदराबाद, कुर्ग आणि गोवा या शहरांचा समावेश असल्याचे अहवालात म्हटले आहे. मात्र, काही काळापूर्वी हे वृत्त खुद्द रश्मिकाने फेटाळले होते.खरं तर, तिच्या लॅविश होम्सबद्दल बोलायचं झालं तर, यात अभिनेत्रीशी क्वचितच कोणी स्पर्धा करू शकेल. ज्या शहरांमध्ये तिची घरे आहेत त्यामध्ये मुंबई, बंगळुरू, हैदराबाद, कुर्ग आणि गोवा या शहरांचा समावेश असल्याचे अहवालात म्हटले आहे. मात्र, काही काळापूर्वी हे वृत्त खुद्द रश्मिकाने फेटाळले होते.एका पोस्टवर कमेंट करताना रश्मिकाने तिच्याकडे पाच घरे असल्याचा दावा फेटाळून लावला. तिने लिहिले होते की, 'हे खरे असते तर चांगले झाले असते'. मात्र, रश्मिकाला नेहमीच लग्जूरियस लाइफस्टाइलची आवड आहे. पण, पाच शहरांमध्ये आलिशान घर असणं हे तिचं स्वप्न आहे. अभिनेत्रीच्या या उत्तराने एका झटक्यात स्पष्ट केले की सोशल मीडियावर तिच्याबद्दल किती अफवा सुरू आहेत. रश्मिकाच्या स्वप्नांना पाच नाही तर 2 घरे नक्कीच आहेत. अलीकडे, पुष्पा अभिनेत्रीने तिच्या गोव्यातील घराचे सुंदर फोटो देखील शेअर केले आहेत. यासोबतच एक मजेशीर कॅप्शनही लिहिले आहे. तुम्ही इन्स्टाग्रामवर रश्मिकाच्या लक्झरी लाइफस्टाइलचा सहज आढावा घेऊ शकता. ती अनेकदा तिच्या घरातील



# इंडस्ट्रीमध्ये जास्त काम का करत नाहीस? मलायका अरोरा

मलायका अरोरा नेहमीच तिच्या फॅशन आणि ट्रेंडी डान्समुळे चर्चेत असते. नुकतेच गुरु रंधावाने या डान्सिंग दिवासोबत त्याचे नवीन गाणे रिलीज केले. या गाण्याच्या लॉन्चिंगच्यावेळी मलायका अरोरा तिच्या ॲक्टिंग करिअरसोबतच तिच्या भीतीबद्दलही मोकळेपणाने बोलली. मलायकाला नेमकी कशाची भीती वाटते याबाबत तिने उघडउघडपणे भाष्य केलं आहे.मलायका अरोरा म्हणाली, "मला अभिनयाच्या खूप ऑफर्स आल्या, पण इतक्या वर्षांत मी या ऑफर्सकडे कधीच लक्ष दिले नाही, मला नेहमीच डान्स आणि टीव्हीमध्ये जास्त रस होता, पण आता मी अभिनयावरही लक्ष केंद्रित करणार आहे. कुणास ठाऊक, कदाचित लवकरच तू मी अभिनय करताना दिसेल.मलायका अरोराचे गुरु रंधावासोबतचे तेरा की ख्याल हे नवीन गाणे नुकतेच रिलीज झाले आहे. रिलीज होताच हे गाणे सोशल मीडियावर व्हायरल झाले. मलायका बऱ्याच दिवसांनी एका म्युझिक व्हिडिओमध्ये दिसत आहे. याबद्दल बोलताना मलायकाने तिची भीती व्यक्त करत म्हटले की, जर मी गाण्यांमधून खूप जास्त दिसू लागले तर माझी मागणी तितकी राहणार नाही आणि लोक मला मिस करणार नाही. गुरु रंधावा आहे मलायकाचा चाहता



मलायकाचे कौतुक करताना गुरू रंधावा म्हणाला, "मला मलायकासोबत काम करायचे होते. कारण प्रत्येकजण तिच्यावर प्रेम करतो. मलायका म्हणाली, अनेक वर्षांपासून हो म्हणता येईल असे कोणतेच गाणे मला मिळाले नाही. मात्र, गुरुचे गाणे ऐकल्यावर मी लगेच हो म्हणाले. गुरुने जेव्हा हे गाणे मला ऐकवले तेव्हा मी अमेरिकेत होते. या गाण्यात गुरु मलायकाबरोबर नाचताना दिसत आहे. . या गाण्यातही त्याने धमाल उडवली आहे.

## शिखर धवनच्या वादळी खेळीच्या जोरावर

# पंजाबचे राजस्थानला 198 धावांचे लक्ष्य!

### राजस्थानला 198 धावांचे लक्ष्य; प्रभसिमरन सिंगने झळकावले अर्धशतक

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६व्या हंगामातील आठवा सामना पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात होत आहे. या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा घेतला. तसेच पंजाब किंग्जने शिखर धवनच्या नाबाद ८६ (५६) धावांच्या जोरावर प्रथम फलंदाजी ४ बाद १९७ धावा केल्या. त्याचबरोबर राजस्थानला १९८ धावांचे लक्ष्य दिले आहे.**

या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या पंजाबला कर्णधार शिखर धवन आणि प्रभसिमरन सिंग यांनी शानदार सुरुवात करुन दिली. या दोघांनी आक्रमक फलंदाजी करताना पहिल्या गड्यासाठी ९० धावांची दमदार भागीदारी केली. त्यानंतर प्रभसिमरन सिंग बाद झाला. त्याने ३४ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकाराच्या मदतीने ६० धावा केल्या.

जेसन होल्डरने घेतल्या सर्वाधिक विकेट्स –

राजस्थान रॉयल्स संघाकडून गोलंदाजी करताना जेसन होल्डरने सर्वाधिक विकेट्स घेतल्या. त्याने आपल्या ४ षटकांत २९ धावा देताना दोन विकेट्स घेतल्या. तसेच आर आश्विने ४ षटकांत २५ धावा देताना एक विकेट घेतली. त्याचबरोबर युजवेंद्र चहलनेही ५० धावा देताना एक विकेट घेतली.



दोन्ही संघांची प्लेइंग-11

पंजाब किंग्ज: शिखर धवन (कर्णधार), प्रभसिमरन सिंग (विकेटकीपर), भानुका राजपक्षे, जितेश शर्मा, शाहरुख खान, सॅम करण, सिकंदर रझा, नॅथन एलिस, हरप्रीत ब्रार, राहुल चहर, अर्शदीप सिंग.

सब्सीट्यूट खेळाडू: अथर्व तायडे, हरप्रीत भाटिया, मॅथ्यू शॉर्ट, मोहित राठी आणि ऋषी धवन.

राजस्थान रॉयल्स: यशस्वी जैस्वाल, जोस बटलर, संजू सॅमसन (कर्णधार), देवदत्त पडिक्कल, रियान पराग, शिमरॉन हेटमायर, जेसन होल्डर, रविचंद्रन अश्विन, ट्रेंट बोल्ट, केएम आसिफ, युजवेंद्र चहल.

सब्सीट्यूट खेळाडू: आकाश वशिष्ठ, मुरुगन अश्विन, कुलदीप यादव आणि डोनोवन फरेरा.

#### दुसऱ्या गड्यासाठी 67 धावांची भागीदारी

**त्यानंतर शिखर धवन आणि जितेश शर्माने संघाचा डाव पुढे नेण्याचे काम केले. धवन आणि जितेश आक्रमक फलंदाजी सुरु ठेवताना दुसऱ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी केली. ज्यामध्ये जितेश शर्माने २७ धावांची योगदान दिले. त्याने १६ चेंडूचा सामना करताना २ चौकार आणि १ षटकार लगावला. त्यानंतर आलेला सिकंदर रझा मात्र फार काळ खेळपट्टीवर टिकू शकला नाही. तो फक्त एक धाव काढून बाद झाला. तसेच शाहरुख खान देखील ११ धावांचे योगदान देऊन बाद झाला.**

---

# एमसीसीने धोनीसह 5 भारतीय खेळाडूंचा केला गौरव!

### स्पेशल यादीत दिले स्थान

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मेरीलेबोन क्रिकेट क्लबने भारतातील पाच खेळाडूंना आपल्या क्लबचे आजीवन सदस्यत्व बहाल केले आहे. मेरीलेबोन क्रिकेट क्लबने (MCC) विश्वचषक विजेत्या कर्णधार एमएस धोनीलाही आजीवन सदस्यत्व बहाल केले आहे. क्लबने सुरेश रैना आणि युवराज सिंग यांच्यासह सर्व १९ पुरुष आणि महिला क्रिकेटपटूंना सन्मानित केले आहे, हे दोघेही धोनीच्या २०११ च्या विश्वचषक विजेत्या संघाचे सदस्य होते.**

**मिताली राज-झूलन गोस्वामी यांनाही सन्मान मिळाला**

या यादीत भारताची माजी महिला कर्णधार मिताली राजचेही नाव आहे. मिताली राजसह महिला एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक विकेट घेण्यात आघाडीवर असणारी झुलन गोस्वामी देखील सन्मान यादीत आहे. या यादीत इंग्लंड आणि भारताचे प्रत्येकी पाच खेळाडू आहेत. एमसीसीचे मुख्य कार्यकारी आणि सचिव गाय लॅव्हेंडर म्हणाले, “आम्ही नवीन आंतरराष्ट्रीय उन्हाळ्याची तयारी करत असताना, एमसीसीच्या मानद आजीवन सदस्यांच्या आमच्या नवीनतम गटाची घोषणा करण्यात सक्षम झाल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. आज जाहीर केलेली नावे आधुनिक काळातील काही महान आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत.एमसीसीची क्रिकेट समिती या खेळातील काही दिग्गजांच्या उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय कारकीर्दीसाठी मानद आजीवन सदस्यत्वासाठी क्रिकेटपटूंच्या नामांकनांचा विचार करते. ज्या व्यक्तींनी एमसीसी किंवा सर्वसाधारणपणे खेळात असाधारण योगदान दिले आहे त्यांना मानद आजीवन सदस्यत्व देखील दिले जाते. एमसीसी समितीने मान्यता दिल्यानंतर, व्यक्तीला स्वीकारण्यासाठी आमंत्रण पत्रे पाठवली जातात. दर वर्षी कोणताही निश्चित संख्या नाही. नामनिर्देशित व्यक्ती कधीही सन्मान स्वीकारू आणि प्राप्त करू शकतात.



#### सन्मान यादीतील इतर खेळाडू

**मेरिसा अगुइलेरा (वेस्ट इंडीज, 2008-2019), जेनी गन (इंग्लंड, 2004-2019), मुहम्मद हाफिज (पाकिस्तान, 2003-2021), रॅचेल हेन्स (ऑस्ट्रेलिया, 2009-2022), लॉरा मार्श (इंग्लंड, 206-2020) , इयॉन मॉर्गन (इंग्लंड, 2006–2022), मशरफे मोर्तझा (बांगलादेश, 2001–2020), केविन पीटरसन (इंग्लंड, 2005–2014), एमी सॅटरथवेट (न्यूझीलंड, 2007–2022), अन्या श्रब्सलंड (2007–2022) ), डेल स्टेन (दक्षिण आफ्रिका, 2004-2020) आणि रॉस टेलर (न्यूझीलंड, 2006-2022)**

# वीरेंद्र सेहवागने पृथ्वी शॉचे टोचले कान

। बुलढाणा। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२३ मध्ये दिल्ली कॅपिटल्स संघ सलग दोन सामने हरला आहे. ऋषभ पंतच्या अनुपस्थितीत डेव्हिड वॉर्नर संघाचे नेतृत्व करत आहे. पृथ्वी शॉने पहिल्या दोन सामन्यात वॉर्नरसोबत डावाची सुरुवात केली.

शॉ पहिल्या दोन सामन्यात फ्लॉप ठरला आहे. लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध शॉला मार्क वुडने १२ धावांवर बाद केले होते. त्यानंतर गुजरात टायटन्स विरुद्धच्या सामन्यात मोहम्मद शमीने त्याला ७ धावांवर बाद केले. टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग शॉ ज्या प्रकारे आउट होत आहे, त्यावरून तो अजिबात खूश नाही. इंडियन एक्सप्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार, सेहवागने क्रिकबझवर शॉच्या कामगिरीवर निशाणा साधला आहे. वीरेंद्र सेहवाग म्हणाला, “पृथ्वी शॉनेही आपल्या चुकांमधून शिकले पाहिजे. शुबमन गिलकडे बघा, जो त्याच्यासोबत अंडर-१९ क्रिकेट खेळला आणि आता भारतासाठी तिन्ही फॉरमॅट खेळत आहे. पण शॉ अजूनही आयपीएलमध्ये संघर्ष करत आहे.

